**महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड**

**(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)**

**महा मेट्रो : रिच – १ कार्य जलद गतीने सुरु**

**पीसीएमसी मार्गावर मेट्रोचे ३० टक्के कार्य पूर्ण**

पुणे,२५ : पुणे शहरात होऊ घातलेले महा मेट्रो चे कार्य आता आकर्षणाचा विषय झाला असून या कामाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पिंपरी चिंचवड रस्त्यावर मेट्रो पिलर सोबतच मेट्रो स्टेशनच्या पियर आर्मचे कार्य देखील जलद गतीने सुरु आहे. या ठिकाणी कार्याचा आढावा घेतला असता ३० टक्क्याहून अधिक कार्य आतापर्यंत रिच-१ येथे पूर्ण झाले आहे. पीसीएमसी ते रेंज हिल पर्यंत अश्या ११.५४ किमीच्या या मार्गावर एकूण ०९ मेट्रो स्टेशन प्रस्तावित आहे. औद्योगिक क्षेत्र,डिफेंस,शासकीय कार्यालय आणि अभियांत्रिकी महाविधालयमुळे रिच-१ मार्गावर वाहनचालकांची मोठी गर्दी होताना निदर्शनास येते. यामुळे वाहन चालवताना होणारा त्रास आणि वाहनामुंळे होणाऱ्या प्रदूषणावर मात करण्यासाठी आगामी काळात मेट्रो सर्वांना करीता फायदेशीर ठरणार आहे. सध्या या ठिकाणी वाहतुकीचे सुयोग्य व्यवस्थापन करून मेट्रोचे कार्य पूर्ण केले जात आहे. या भागात मेट्रोच्या कार्याला स्थानिक नागरिक तसेच नागरी प्रशासनाचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

आतापर्यंत झालेल्या कार्याची अधिकृत आकडेवारी पुढील प्रमाणे आहे.

पाईल ४५७ पैकी ६२८ , फाऊंडेशन २०३ पैकी ४५६, पियर १६८ पैकी ४५६, पियर कॅप ८४ पैकी ४५६, स्टेशन पियर आर्म कॉंक्रिट ०२ पैकी ९०, सेगमेंट कास्टिंग ९०० पैकी ३१२३, स्टेशन गर्डर कास्टिंग ३३ पैकी ११३४, सेगमेंट लॉंचिंग ३३ पैकी ४५५.